मुलांसाठी बाइबल

प्रस्तुत

# येशू आणि जक्कय



लेखक: Edward Hughes
रेखाचित्रकार: Janie Forest
रूपान्तरकार: Ruth Klassen
Alastair Paterson
अनुवादक: Rev. Shilas Gavit
निर्माता: Bible for Children
www.M1914.org

BFC
PO Box 3
Winnipeg, MB R3C 2G1
Canada

©2020 Bible for Children, Inc.
परवाना (लाइसेंस): तुम्ही जोपर्यंत ही गोष्ट विकत नाहीत, तोपर्यंत तुम्ही ती कॉपी किंवा मुद्रित करू शकता.



एके दिवशी, येशू यरीहो
शहरातून गेले. फार
वर्षांपूर्वी यहोशवाने
या शहराचा नाश केला
होता. ते शहर पुन्हा
वसवण्यात आले होते
व आता त्या शहरात
पुष्कळ लोक राहात
होते. त्या लोकांपैकी
जक्कय नावाचा एक
मनुष्य होता.



तो इतर लोकांकडून कर वसूल करित असल्यामुळे तेथील इतर लोकांना जक्कय कदाचित आवडत नसावा. तो जकातदार होता. जक्कय काही पैसा सरकारी खजिन्यात जमा करीत असे परंतू पुष्कळ पैसा स्वतःसाठी ठेवून घेत असे.

कर वसूल करणारा असल्यामुळे जक्कय फारच श्रीमंत बनला होता. म्हणून कदाचित तो राहात होता त्या विभागात त्याचे घर सर्वांपेक्षा अधिक मोठे व चांगले असावे.



परंतू त्याची उंची कमी होती –
पैशांच्या बाबतीत नव्हे, परंतू
त्याच्या शरीराच्या उंचीत तो कमी
होता, म्हणजे तो ठेंगणा होता. इतर
लोकांऐवढी जक्कयची उंची
वाढली नव्हती.





येशू यरीहो शहरात आहे असे जेंव्हा जक्कयला कळले, तेंव्हा त्या ठेंगण्या जकातदराला नासरेथ येथील येशू नावाचा मनुष्य जो स्वतःला देवाचा पुत्र म्हणवतो त्याला पाहण्याची इच्छा झाली. परंतू येशूच्या भोवती फारच दाट गर्दी होती... उंच उंच लोक होते.



जक्कयला एक युक्ति सुचली !
जर तो गर्दीच्या पुढे जाऊ
शकला... आणि रस्त्याच्या
कडेला असलेल्या झाडवर
जर चढू शकला... तर तो
येशूला पाहू शकेल.



तेंव्हा तो उंबराच्या झाडावर
चढला, आणि येशू दिसेल अशी
सुविधा करुन तो झाडाच्या
फांदीवर बसला. "येथून मला
येशूला चांगले पाहता येईल"
असे कदाचित तो स्वतःशीच
म्हणाला असेल. "मी कोणाच्या
नजरेस न येता
त्याला पाहिन."

"जक्कया लवकर कर आणि खाली उतर." या वाणीवर तो ठेंगणा जकातदार विश्वासच करु शकत नव्हता. येशू त्या झाडाच्या खाली थांबला होता. येशू त्याच्याकडे पाहात होता. येशू त्याला हाक मारत होता !





येशूने जक्कयाला हाक मारली
तेंव्हा जर त्याला नवल वाटले
असेल तर, जेंव्हा येशूने त्याला
म्हटले, "आज मला तुझ्या घरि
उतरावयाचे आहे," हे शब्द
ऐकल्यावर तर त्याला फारच
आश्चर्य वाटले असेल. जक्कय
ऐवढ्या वेगात खाली आला
की तो जणू खाली
पडणारच होता.

येशू त्याच्या घरि येत आहे हे पाहून जक्कय रोमांचित झाला होता. परंतू लोकांना हे आवडले नाही. जक्कया सारख्या पापी मनुष्याच्या घरि येशूने जायला नको होते अशी त्यांनी कुरकुर केली.





येशूने जक्कयला पुर्ण
नविन जिवन दिले.
जक्कय म्हणाला,
"प्रभुजी, पाहा, मी
आपली अर्धी संपत्ती
गरिबांस देतो. आणि जर
मी कोणाची फसवणुक
केली असेल तर मी त्यांना
चारपट परत करतो."

जक्कयला नविन जिवन
मिळाले हे पाहून येशूला
आनंद झाला. लोक
पापापासून मागे फिरुन जे
योग्य ते करतात ते येशूला
आवडते. येशूने म्हटले,
"मनुष्याचा पुत्र हरवलेले
शोधावयास व तारावयास
आला आहे." त्या दिवशी
यरीहो शहरात येशूला
जक्कय सापडला !



येशू आणि जक्कय

परमेश्वराची वाणी - बाइबल मधून गोष्ट

घेण्यात आली आहे

लूक १९

"तुझ्या वचनांच्या उलगड्याने प्रकाश प्राप्त होतो."
स्तोत्रसंहिता ११९:१३०

# समाप्त

बाइबलमधील ही गोष्ट आम्हांला आमच्या सुंदर परमेश्वराविषयी सांगते ज्याने आम्हांला बनविले आणि ज्याची अशी इच्छा आहे की आम्ही त्याला ओळखावे.

परमेश्वराला माहित आहे की आम्ही वाईट गोष्टी केल्या आहेत, ज्याला तो पाप म्हणतो. पापाची शिक्षा मरण आहे, पण परमेश्वर तुमच्यावर इतके प्रेम करतो की त्याला तुमच्या पापांची शिक्षा मिळावी आणि वधस्तंभावर मरावे म्हणून त्याच्या एकुलता एक पुत्र येशू याला पाठविले. नंतर येशू जिवंत झाला आणि स्वर्गातील घरी गेला. जर तुम्ही येशूमध्ये विश्वास ठेवता आणि तुमच्या पापांसाठी त्याने क्षमा करावी अशी त्याला विनंती करता, तर तो नक्की क्षमा करील. तो आता तुमच्याबरोबर येऊन राहील आणि तुम्ही त्याच्याबरोबर कायम राहणार.

हे सत्य आहे यावर जर तुम्ही विश्वास ठेवता, तर परमेश्वराला हे सांगाः
प्रिय येशू, तू परमेश्वर आहेस आणि माझ्या पापांसाठी मरण पावण्यास मनुष्य बनला आणि आता तू जिवंत आहे यावर माझा विश्वास आहे. कृपा करून माझ्या जीवनात ये आणि माझ्या पापांची मला क्षमा कर, जेणेकरून आता मला नवीन जीवन प्राप्त होईल, आणि एके दिवस मी कायम तुझ्याबरोबर राहण्यासाठी
येईन. तुझी आज्ञा पाळण्यासाठी आणि तुझे मूल होऊन जगण्यासाठी मला मदत कर. आमेन.

बाइबल वाचा आणि परमेश्वराशी रोज बोला! योहान 3:16